ePaper

**“ज्ञानेश कुमारांनी भाजपाची मदत केली हे आता स्पष्टच झालं”; राहुल गांधी**



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 06 ऑक्टोबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

विश्वविक्रमी सोहळ्यात भाजपच्या सेवाकार्याचा जागर!

## "फॉर्म ६ मधील बदल न्यायालयाच्या परवानगीशिवाय" सरन्यायाधीशांकडून स्पष्ट

# ज्ञानेश कुमार 'सुप्रीम' अडचणीत?



**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पहिल्यांदा मतदान करणाऱ्या नवमतदारांच्या नोंदणीसाठी वापरल्या जाणाऱ्या ‘फॉर्म ६’मध्ये निवडणूक आयोगाच्या ऑनलाइन पोर्टलवर करण्यात आलेल्या कथित बदलांवर सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. या बदलांना सर्वोच्च न्यायालयाने कोणतीही मंजुरी दिलेली नसल्याचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी स्पष्ट केले. निवडणूक आयोगाचा अहवाल सादर झाल्यानंतर ‘कोणी आणि काय फेरफार केले’, याची सखोल चौकशी केली जाईल, असेही त्यांनी नमूद केले.**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात दाखल याचिकांवर सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू आहे. याच सुनावणीदरम्यान ‘फॉर्म ६’मध्ये करण्यात आलेल्या बदलांचा मुद्दा उपस्थित झाला. ज्येष्ठ वकील मेनका गुरुस्वामी यांनी या प्रकरणी वृत्तपत्रातील वृत्ताचा संदर्भ देत न्यायालयाचे लक्ष वेधले.

मतदारयादीत नाव नोंदविण्यासाठी निवडणूक आयोगाने ‘ECINET’ या ऑनलाइन पोर्टलवर ‘फॉर्म ६’चे डिजिटल स्वरूप उपलब्ध करून दिले होते. या ऑनलाइन फॉर्ममध्ये कायदेशीर मंजुरीशिवाय एक नवीन रकाना जोडण्यात आल्याचा आरोप आहे. या रकान्यात अर्जदाराच्या पालकांची मतदारयादीतील विशेष सखोल पुनरीक्षण अर्थात ‘SIR’शी संबंधित माहिती मागविण्यात येत होती.

मूळ ‘फॉर्म ६’मध्ये अधिकृतरीत्या कोणताही बदल करण्यात आलेला नसताना ऑनलाइन पोर्टलवर अतिरिक्त अट समाविष्ट करण्यात आल्याने नवमतदारांना अनावश्यक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे. दिल्लीतील ‘SIR’ प्रक्रियेदरम्यान या नव्या अटींसह फॉर्म वितरित करण्यात आले आणि त्याच आधारे नागरिकांना नोटिसाही बजावण्यात आल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

यावर सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, सुधारित ‘फॉर्म ६’ला सर्वोच्च न्यायालयाची कोणतीही मंजुरी मिळालेली नाही. निवडणूक आयोगाचा अहवाल न्यायालयात दाखल झाल्यानंतर या बदलामागे नेमके कोण होते आणि काय फेरफार करण्यात आला, याचा सविस्तर तपास केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, या प्रकरणात मुख्य निवडणूक आयुक्तांच्या भूमिकेवरही गंभीर आरोप करण्यात आले आहेत. ॲडव्होकेट शैलेंद्र मणी त्रिपाठी यांनी दाखल केलेल्या याचिकेत जुलै २०२६मध्ये निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी संगनमताने नियम डावलून ‘ECINET’ पोर्टलवर बदल केल्याचा दावा केला आहे. १३ ऑगस्ट २०२६ रोजी निवडणूक आयुक्त संधू यांनी हा बदल अनधिकृत आणि बेकायदेशीर असल्याचे सांगून तो हटवण्याचे निर्देश दिले होते. मात्र, त्यानंतरही हा फॉर्म पोर्टलवर उपलब्ध राहिल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे.

मुख्य निवडणूक आयुक्तांचे हे कृत्य त्यांच्या अधिकृत कर्तव्याच्या कक्षेबाहेर असल्याचा दावा करत याचिकाकर्त्यांनी वैयक्तिक गुन्हेगारी उत्तरदायित्व निश्चित करण्याची मागणी केली आहे. वाढत्या वादाच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने ‘SIR’ प्रक्रिया पूर्ण झालेल्या राज्यांमधून ही अतिरिक्त अट हटवली असून, यापुढे १९६०च्या नियमांनुसार निर्धारित वैधानिक फॉर्मच वापरले जातील, असे स्पष्ट केले आहे. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची दखल घेतल्याने आता निवडणूक आयोगाच्या भूमिकेची न्यायालयीन छाननी होणार आहे.

### मुख्य निवडणूक आयुक्तांवर वैयक्तिक गुन्हेगारीचा आरोप

ॲडव्होकेट शैलेंद्र मणी त्रिपाठी यांनी दाखल केलेल्या या याचिकेत मुख्य निवडणूक आयुक्तांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. जुलै २०२६ मध्ये निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी संगनमताने नियम डावलून ECINET पोर्टलवर हा बदल केला. १३ ऑगस्ट २०२६ रोजी निवडणूक आयुक्त संधू यांनी हा बदल “अनाधिकृत आणि बेकायदेशीर” असल्याचे सांगत तो तात्काळ हटवण्याचे आदेश दिले होते. तरीही हा फॉर्म पोर्टलवर सुरूच ठेवण्यात आला. मुख्य निवडणूक आयुक्तांचे हे कृत्य त्यांच्या अधिकृत कर्तव्याच्या कक्षेत येत नाही, असा दावा करत याचिकेत त्यांच्यावर वैयक्तिक गुन्हेगारी उत्तरदायित्वाची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### नेमका वाद काय?

मतदारयादीतील नाव नोंदणीसाठी निवडणूक आयोगाने आपल्या ‘ECINET’ ऑनलाइन पोर्टलवर ‘फॉर्म ६’चा डिजिटल प्रकार उपलब्ध करून दिला होता. यामध्ये कायदेशीर मंजुरी नसताना एका नवीन रकान्याचा समावेश करण्यात आला. या नवीन रकान्यात अर्जदाराच्या पालकांची मतदारयादीतील विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) संदर्भातील माहिती द्यावी लागत होती.

# MPSC आंदोलनात घुमला कोल्हापुरी ठसका

## २४ वर्षीय तरुणाचा आयोगाला थेट सवाल, 'उद्या विधानसभेत दिसेन'चा निर्धार

**महाईन्यूज । पुणे**

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कारभाराविरोधात आणि पेपरफुटीच्या प्रकरणांविरोधात पुण्यात विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनात २४ वर्षीय विवेकानंद मारुती पाटील याच्या आक्रमक भाषणाने लक्ष वेधून घेतले आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यातील माजगावचा रहिवासी असलेल्या विवेकानंदच्या भाषणाचे व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात प्रसारित होत असून, त्याच्या परखड वक्तव्यांची स्पर्धा परीक्षार्थींमध्ये चर्चा सुरू आहे.**



आंदोलनाच्या व्यासपीठावर बोलताना विवेकानंदने एमपीएससीच्या कार्यपद्धतीवर थेट प्रश्न उपस्थित केले. "मी एवढे जिव्हारी लागणारे बोलत असल्याने भविष्यात एमपीएससीची लेखी परीक्षा पास झालो, तर मला मुलाखतीत अडकवले जाऊ शकते. मात्र, मी तिथे सापडणार नाही; काय सांगावे, उद्या कदाचित थेट विधानसभेत दिसेन," अशा आशयाचे वक्तव्य त्याने केले. त्याच्या या वक्तव्याला उपस्थित विद्यार्थ्यांकडून टाळ्या आणि घोषणांनी प्रतिसाद मिळाला.

विवेकानंदची पार्श्वभूमी संघर्षाची आहे. राधानगरी तालुक्यातील माजगाव येथे अल्पभूधारक शेतकरी कुटुंबात त्याचा जन्म झाला. त्याचे वडील शेतकरी असून आई गृहिणी आहे. कुरुकली येथील भोगावती महाविद्यालयातून त्याने राज्यशास्त्र विषयातून पदवी घेतली. महाविद्यालयीन शिक्षण सुरू असतानाच त्याने एमपीएससीच्या अभ्यासाला सुरुवात केली. आतापर्यंत त्याने एमपीएससीचे दोन प्रयत्न दिले आहेत.

मराठी भाषेवर प्रभुत्व असलेल्या विवेकानंदने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या मुख्य परीक्षेची तयारीही केली असून, दुसऱ्यांदा मराठी माध्यमातून यूपीएससी मुख्य परीक्षा देण्याची तयारी तो करत आहे. त्याची लहान बहीणही त्याचप्रमाणे एमपीएससी परीक्षेची तयारी करत आहे.

बालपणापासूनच वक्तृत्वाची आवड असलेल्या विवेकानंदने पुण्यातील आंदोलनाच्या व्यासपीठावर ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी कुटुंबांतील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना आवाज दिला. स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी वर्षानुवर्षे मेहनत करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अडचणी आणि परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकतेचे प्रश्न त्याने आपल्या भाषणातून मांडले.

आंदोलनातील त्याच्या भाषणातील काही व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर विवेकानंद पाटील हा स्पर्धा परीक्षार्थींमध्ये चर्चेचा विषय ठरला आहे. त्याच्या वक्तृत्वातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना व्यासपीठ मिळाल्याची भावना अनेकांकडून व्यक्त होत आहे.

### 'मुलाखतीत अडकवाल, पण विधानसभेत दिसेन!'

एमपीएससीच्या कारभारावर प्रश्न उपस्थित करत विवेकानंद पाटील यांनी आंदोलनाच्या व्यासपीठावर आक्रमक भूमिका मांडली. "लेखी परीक्षा उत्तीर्ण झालो, तर मुलाखतीत अडकवण्याचा प्रयत्न होऊ शकतो; मात्र उद्या मी विधानसभेत दिसेन," या आशयाच्या त्यांच्या वक्तव्याला विद्यार्थ्यांनी जोरदार प्रतिसाद दिला. त्यांच्या भाषणाचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात प्रसारित होत आहे.

# "त्यासाठी कुणाचे पाय धरायला लागले तरी मी तयार आहे"; राज ठाकरे

**महाईन्यूज । पुणे**

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अनियमित कारभाराविरोधात आणि पेपरफुटीच्या घटनांविरोधात पुण्यात सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाला मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोमवारी भेट देत आंदोलक विद्यार्थ्यांशी संवाद साधला. महाराष्ट्रातील तरुण-तरुणींना रोजगार मिळण्यासाठी कोणत्याही पातळीवर प्रयत्न करण्याची तयारी असल्याचे सांगत, "महाराष्ट्राच्या मुला-मुलींना नोकऱ्या मिळण्यासाठी कुणाचेही पाय धरावे लागले तरी राज ठाकरे ते पाय धरायला तयार आहे," असा शब्द त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.**



एमपीएससीच्या कारभाराविरोधात पुण्यात हजारो विद्यार्थी रस्त्यावर उतरले असून काही विद्यार्थी उपोषणालाही बसले आहेत. या आंदोलनस्थळी भेट देताना राज ठाकरे यांनी विद्यार्थ्यांच्या संतापात आपण सहभागी होण्यासाठी आलो असल्याचे सांगितले. सरकारी यंत्रणेतील त्रुटींमुळे तरुणांच्या आयुष्यातील उमेदीचा काळ वाया जात असल्याचे नमूद करत त्यांनी विद्यार्थ्यांच्या वेदना समजून घेण्याची गरज व्यक्त केली. "तुमच्याकडे पेपर फुटत आहेत, आमच्याकडे मतं फुटत आहेत. जसं तुमच्या आयुष्यातली वर्षे निघून जातात, तशी आमचीही जातात," असे ठाकरे म्हणाले.

विद्यार्थ्यांनी आपल्या मूळ प्रश्नांपासून दूर जाऊ नये, असे आवाहन करत त्यांनी जातीपातीच्या राजकारणात अडकू नका, असा सल्ला दिला. आंदोलनस्थळी अनेक नेते येतील, भाषणे करतील; मात्र केवळ त्यावर अवलंबून न राहता विद्यार्थ्यांनी आपल्या प्रश्नांसाठी सातत्याने दबाव निर्माण करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचा राग आणि असंतोष कायम राहणे गरजेचे असून, सरकारला आपल्या प्रश्नांची तीव्रता जाणवेल, अशा पद्धतीने आंदोलनाची दिशा ठरवावी, असेही त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या ७० हजार पदभरतीच्या मागणीवर भाष्य करताना ठाकरे यांनी ही मागणी दुसरे सरकार आले तरी पूर्ण होईलच असे नाही, असे मत व्यक्त केले. मात्र महाराष्ट्रातील तरुणांना नोकऱ्या आणि रोजगाराच्या संधी मिळाल्याच पाहिजेत, अशी भूमिका त्यांनी मांडली. आरक्षणाची मागणी केली जाते; परंतु सरकारी नोकऱ्याच उपलब्ध नसतील तर आरक्षणाचा लाभ कोणाला मिळणार, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. केंद्र आणि राज्य सरकारच्या धोरणांमध्ये सरकारी संस्थांच्या खासगीकरणाचा मुद्दा उपस्थित करत त्यांनी रोजगाराच्या प्रश्नावरही भाष्य केले.

"रोज कुणीतरी येणार, इथे भाषण करणार आणि तुम्ही टाळ्या वाजवणार; यामध्ये आयुष्य घालवू नका. जे आयुष्य आहे ते हेच आहे," असे सांगत विद्यार्थ्यांनी आपल्या भवितव्याबाबत अधिक सजग राहण्याचे आवाहन ठाकरे यांनी केले. आंदोलन केवळ भावनेच्या भरात न चालवता परिस्थिती आणि वस्तुस्थिती समजून घेऊन पुढील भूमिका ठरवावी, असेही ते म्हणाले.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विद्यार्थी प्रतिनिधींच्या शिष्टमंडळाशी चर्चा करून विविध मागण्यांबाबत आश्वासने दिली आहेत. ड्रग्स इन्स्पेक्टर परीक्षेतील पेपरफुटीप्रकरणी एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. मात्र, आयोगाच्या अध्यक्षांच्या राजीनाम्याच्या मागणीवर विद्यार्थी ठाम असून, त्यासाठी आंदोलन सुरू ठेवण्याची भूमिका त्यांनी घेतली आहे. या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला भेट देत त्यांच्या मागण्यांबाबत पाठिंबा आणि सहकार्याची भूमिका व्यक्त केली.

# विश्वविक्रमी सोहळ्यात भाजपच्या सेवाकार्याचा जागर!

## आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराला पदाधिकारी-कार्यकर्त्यांची साथ

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'ला विश्वविक्रमी ढोल-ताशा मानवंदना देण्यासाठी आयोजित सोहळ्यात आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकारातून सामाजिक बांधिलकी जपणारे विविध उपक्रम राबविण्यात आले. भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून नशामुक्त भारताची सामूहिक प्रतिज्ञा, रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, गोसेवा अभियानाची जनजागृती आणि भारतमातेचे रांगोळी रेखाटन करण्यात आले. या उपक्रमांना नागरिक आणि शिव-शंभूप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.**



हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून रविवारी, दि. ४ ऑक्टोबर रोजी आयोजित सोहळ्यात हजारो वादक आणि नागरिक सहभागी झाले. शिव-शंभूंच्या शौर्याला मानवंदना देतानाच त्यांच्या विचारांची प्रेरणा समाजहिताच्या कृतीतून पुढे नेण्यावर भर देण्यात आला. सांस्कृतिक परंपरा जपण्यासोबत नागरिकांचे आरोग्य, युवा पिढीची व्यसनमुक्ती आणि सेवाभावाची जागृती यांना या उपक्रमांतून प्राधान्य देण्यात आले, अशी माहिती सरचिटणीस विकास डोळस आणि संजय पटनी यांनी दिली.

भाजपाच्या सेवा संकल्प अभियानांतर्गत पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या सेवाभावाच्या प्रेरणेतून, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण यांच्या संघटनात्मक मार्गदर्शनाच्या भावनेतून समाजसेवेचे उपक्रम पुढे नेण्याचा संदेश या सोहळ्यात देण्यात आला.

### व्यसनमुक्त युवा पिढीसाठी सामूहिक निर्धार

'नशामुक्त भारत'च्या सामूहिक प्रतिज्ञेत उपस्थितांनी सहभाग घेतला. स्वतः व्यसनांपासून दूर राहण्यासोबत कुटुंब, मित्रपरिवार आणि समाजात नशामुक्तीविषयी जागृती करण्याचा संकल्प करण्यात आला. युवा पिढीचे निरोगी भविष्य घडविण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने योगदान देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

### रक्तदान आणि आरोग्य शिबिरातून सेवाभाव

रक्तदान शिबिराला प्रतिसाद देत रक्तदात्यांनी गरजू रुग्णांसाठी मदतीचा हात पुढे केला. आरोग्य शिबिराच्या माध्यमातून नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जागृती करण्यात आली. या उपक्रमांसाठी डॉक्टर, आरोग्य कर्मचारी आणि स्वयंसेवकांनी योगदान दिले. आमदार लांडगे यांच्या पुढाकारातून सांस्कृतिक सोहळ्यासोबत लोकसेवेचे उपक्रम राबविल्यामुळे नागरिकांना सहभागी होण्याची संधी मिळाली, असे सरचिटणीस पटनी यांनी नमूद केले.

### गोसेवा जनजागृती आणि भारतमातेच्या रांगोळीचे आकर्षण

गोसेवा आणि गोमाता सन्मान अभियानाचा संदेश उपस्थितांपर्यंत पोहोचविण्यात आला. सेवा आणि संवेदनशीलतेच्या भावनेतून अभियानात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. कलाकारांनी रेखाटलेली भारतमातेची मनमोहक रांगोळी विशेष आकर्षण ठरली. संपूर्ण 'वंदे मातरम्'च्या सामूहिक गायनातून मातृभूमीला स्वरांची मानवंदना अर्पण करण्यात आली. ढोल-ताशांचा एकसंध ठेका, १११ शंखांचा सामूहिक शंखनाद आणि शिव-शंभूंच्या जयघोषासोबत समाजसेवेचा संदेशही नागरिकांपर्यंत पोहोचला. या उपक्रमांच्या यशस्वितेसाठी भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते, स्वयंसेवक, वादक, पथकप्रमुख आणि नागरिकांनी सहकार्य केल्याचे पटनी यांनी सांगितले.

> “शिव-शंभूंच्या विचारांची प्रेरणा घेऊन समाजासाठी प्रत्यक्ष काम करणे, ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. विश्वविक्रमी ढोल-ताशा मानवंदना सोहळ्यात आपल्या संस्कृतीची ताकद अनुभवली; त्याचबरोबर रक्तदान, आरोग्य शिबिर, नशामुक्तीची प्रतिज्ञा आणि गोसेवा जनजागृतीतून नागरिकांचा सेवाभावही दिसून आला. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या सेवाभावाच्या प्रेरणेतून, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनातून भाजपचा प्रत्येक कार्यकर्ता समाजाशी असलेली बांधिलकी जपत आहे. पक्ष संघटनेची ताकद पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या सातत्यपूर्ण जनसेवेत आहे. नागरिकांच्या गरजा समजून घेणे, त्यांच्या मदतीला धावून जाणे आणि समाजहिताच्या उपक्रमांमध्ये त्यांना सहभागी करून घेणे, या भावनेने आपण काम करीत आहोत.या सोहळ्यात योगदान देणारे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, स्वयंसेवक, रक्तदाते, डॉक्टर, कलाकार, वादक आणि नागरिकांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. युवा पिढी व्यसनमुक्त राहावी, प्रत्येक कुटुंब आरोग्याबाबत जागरूक व्हावे आणि समाजात परस्पर सहकार्याची भावना वाढावी, यासाठी आपण एकत्र प्रयत्न करूया. शिव-शंभूंचा सांस्कृतिक वारसा जपताना समाजसेवेचा हा संकल्पही सातत्याने पुढे नेऊया!”
>
> **- महेश लांडगे, आमदार तथा अध्यक्ष, हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट.**

# विद्या व्हॅली नॉर्थ पॉइंट स्कूलच्या शिरपेचात मानाचा तुरा...

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**विद्या व्हॅली नॉर्थ पॉइंट स्कूलसाठी अभिमानाचा क्षण! शाळेची इयत्ता चौथीतील विद्यार्थिनी कु. मायरा पाटील हिने जिल्हा परिषद जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धेत ११ वर्षांखालील गटात चार कांस्यपदके पटकावून शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे.इनलाइन स्केटिंग प्रकारात सहभागी झालेल्या मायराने इनलाइन ट्रॅक शर्यतीतील २.५ लॅप व ५ लॅप, तसेच इनलाइन रोड शर्यतीतील १ लॅप व ५ लॅप अशा चार प्रकारात कांस्य पदके मिळवली.**



या उल्लेखनीय कामगिरीमुळे तिची विभागीय (झोनल) स्तरावरील स्केटिंग स्पर्धेसाठी निवड झाली असून, ती आता तेथे शाळेचे प्रतिनिधित्व करणार आहे. एवढ्या लहान वयात मायराने मिळवलेल्या या घवघवीत यशाबद्दल शाळेच्या प्राचार्या प्रा. पल्लवी शिंदे यांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले. “आमच्या या लहानग्या खेळाडूचा आम्हा सर्वांना अत्यंत अभिमान आहे.

आगामी विभागीय स्पर्धेसाठी तिला खूप खूप शुभेच्छा,” असे त्या म्हणाल्या. शाळेचे संचालक डॉ. अशोक देवीकर यांनीही मायराचे कौतुक करून तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. मायराच्या या यशामागे शाळेच्या क्रीडा शिक्षिका सौ. श्रुती साखरे यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, पाठबळ आणि प्रोत्साहन मोलाचे ठरले. त्यांच्या परिश्रमांबद्दल शाळा व्यवस्थापनाने त्यांचे विशेष आभार मानले. मायराच्या या कामगिरीमुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, संपूर्ण विद्या व्हॅली नॉर्थ पॉइंट स्कूल परिवारात आनंदाचे वातावरण आहे. शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विभागीय स्पर्धेतही ती अशीच दमदार कामगिरी करेल, अशी अपेक्षा सर्वांनी व्यक्त केली आहे.



## भूमिका

**निवडणूक आयोग ही भारतीय लोकशाहीची अत्यंत महत्त्वाची घटनात्मक संस्था आहे. त्यामुळे आयोगाच्या अंतर्गत मतभेद, निर्णयप्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत निर्माण होणारे प्रश्न किंवा आयुक्तांमधील मतभेद यांच्या बातम्या समोर आल्या की सामान्य नागरिक अस्वस्थ होणे स्वाभाविक आहे.**

# निवडणूक आयोगाच्या पारदर्शकतेची कसोटी!




निवडणूक प्रक्रिया केवळ निष्पक्ष असणे पुरेसे नाही, तर ती निष्पक्ष आहे, असा विश्वासही जनतेच्या मनात निर्माण झाला पाहिजे.

टी. एन. शेषन यांनी मुख्य निवडणूक आयुक्त या पदाची ताकद देशाला दाखवून दिली. एखाद्या संस्थेला मिळालेले अधिकार तेव्हा अर्थपूर्ण ठरतात, जेव्हा त्यांचा वापर पारदर्शकता आणि घटनात्मक जबाबदारीने केला जातो. निवडणूक आयोगाकडे प्रचंड अधिकार आहेत. मात्र, अधिकार मोठे असतील, तर त्यासोबत उत्तरदायित्वही तितकेच मोठे असते. नव्या मतदारांच्या नोंदणीसाठीच्या फॉर्म क्रमांक ६ मध्ये करण्यात आलेल्या बदलांवरूनही प्रश्न उपस्थित झाले. मतदार यादीत नाव नोंदविण्याची प्रक्रिया शक्य तितकी सुलभ असली पाहिजे. विशेषतः ग्रामीण भागातील आणि प्रथमच मतदान करणाऱ्या तरुणांना अनावश्यक अडथळे निर्माण होणे लोकशाहीच्या दृष्टीने योग्य नाही. या निर्णयाला अन्य दोन निवडणूक आयुक्तांनी विरोध केला असल्याचे वृत्त असेल, तर त्यामागील कारणे आणि निर्णयप्रक्रिया जनतेसमोर स्पष्ट होणे आवश्यक आहे.

टी. एन. शेषन यांच्या काळात सर्वोच्च न्यायालयाने मुख्य निवडणूक आयुक्त आणि अन्य निवडणूक आयुक्त निर्णयप्रक्रियेत समान असल्याचे स्पष्ट केले होते. त्यामुळे सध्याच्या मतभेदांकडे केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोप म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. या संस्थेवरील जनतेचा विश्वास अबाधित ठेवणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.याचबरोबर भारतीय वैमानिक कॅप्टन स्मित मच्छार यांच्या धैर्याची दखल घ्यायलाच हवी. सहवैमानिकाच्या हल्ल्यात जखमी होऊनही त्यांनी १८० प्रवाशांचे प्राण वाचविल्याचे वृत्त अत्यंत कौतुकास्पद आहे. त्यांच्या शौर्यामुळे भारताची मान उंचावली आहे. मात्र, या घटनेतील सुरक्षाविषयक प्रश्नही तितकेच गंभीर आहेत. संवेदनशील मार्गावर सहवैमानिकाची नियुक्ती कशी झाली, याची चौकशी होणे आवश्यक आहे.

लोकशाही असो वा विमानवाहतूक, विश्वास हीच सर्वांत मोठी भांडवलाची गोष्ट आहे. संस्थांवर काळे डाग पडण्यापूर्वी प्रश्न विचारले गेले पाहिजेत आणि शंका निर्माण झाल्यानंतर त्यांचे निरसनही तितक्याच पारदर्शकपणे झाले पाहिजे. कारण संशयाचे धुके जितके वाढते, तितका विश्वासाचा सूर्य झाकोळला जातो.

## प्रासंगिक »

# मातीची भांडी

**एका गावात गणू नावाचा कुंभार राहत होता. त्याची भांडी मजबूत आणि सुंदर होती. मात्र, त्याचा मुलगा विठ्ठल कामात फार घाई करायचा. एकदा विठ्ठलने घाईघाईने काही मडकी तयार केली.**

गणूने ती पाहून सांगितले, “माती चांगली आहे; पण तिला योग्य वेळ दिला नाहीस.” विठ्ठलला वाटले, बाबा उगाचच वेळ घालवत आहेत. त्याने मडकी लगेच बाजारात नेली. ग्राहकांनी मडकी घेतली; पण काही दिवसांत अनेक मडकी तडकली. लोकांनी विठ्ठलच्या कामावर नाराजी व्यक्त केली.

विठ्ठल निराश होऊन वडिलांकडे आला. गणू म्हणाला, “मातीला आकार देणे सोपे आहे; पण तिला मजबूत होण्यासाठी वेळ द्यावा लागतो. माणसाच्या कौशल्याचेही तसेच आहे. घाईने मिळालेले यश टिकत नाही.”

विठ्ठलने पुन्हा काम सुरू केले. यावेळी त्याने प्रत्येक मडक्याला योग्य आकार दिला, पुरेसा वेळ वाळवले आणि काळजीपूर्वक भाजले. पुढच्या बाजारात त्याची सर्व मडकी विकली गेली.

- तात्पर्य : घाईपेक्षा संयम, मेहनत आणि योग्य प्रक्रिया यांना यशात अधिक महत्त्व असते.

भारताला संघर्षातून यश मिळवणारे नायक नेहमीच आवडतात. प्रतिकूल परिस्थितीतून वर येणारा खेळाडू, आर्थिक अडचणींवर मात करून पदक जिंकणारी खेळाडू आणि अपमान-उपेक्षेला उत्तर देणारे विजेते यांचे कौतुक आपण भरभरून करतो.

# ‘अंडरडॉग’चा टॅग उतरवण्याची वेळ आली!

मात्र, प्रश्न असा आहे की, प्रत्येक वेळी आपल्या खेळाडूंना ‘अंडरडॉग’ राहण्याची वेळ का यावी? संघर्षाची ही कहाणी प्रेरणादायी असली, तरी उत्तम व्यवस्था उभी करून हा संघर्ष कमी करणे हीच खरी जबाबदारी आहे.

आशियाई क्रीडा स्पर्धेतील भारताची कामगिरी याच वास्तवाकडे लक्ष वेधते. २१ सुवर्ण, २७ रौप्य आणि ३७ कांस्य अशी ८५ पदके भारताने मिळवली. मागील स्पर्धेच्या तुलनेत ही संख्या कमी आहे. मात्र, केवळ पदकांची संख्या पाहून चित्र स्पष्ट होत नाही. कोणत्या खेळात आपण सातत्याने मागे पडतो, खेळाडूंची तयारी किती दर्जेदार आहे आणि आंतरराष्ट्रीय दबाव हाताळण्यासाठी त्यांना कितपत तयार केले जाते, हे अधिक महत्त्वाचे आहे. टेनिस, शूटिंग, फेन्सिंग, रोइंग आणि स्क्वॉशसारख्या खेळांकडून अपेक्षा होत्या; मात्र कामगिरी निराशाजनक ठरली.

काही खेळाडूंनी ऐनवेळी माघार घेतली किंवा स्पर्धा पूर्ण केली नाही. दुखापत अथवा फिटनेसची समस्या



असेल, तर त्याची कारणे आणि निवड प्रक्रियेतील त्रुटी स्पष्ट झाल्या पाहिजेत. खेळाडू आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी पूर्णपणे तयार नसतील, तर त्यांना पाठविण्यापूर्वीच त्याची दखल घेतली पाहिजे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे मानसिक तयारी. मोठ्या व्यासपीठावर दबावाखाली कामगिरी करण्याचे प्रशिक्षण खेळाडूंना नियमितपणे मिळायला हवे. हरलेला सामना पुन्हा जिंकण्याची मानसिकता, अपयशातून सावरण्याची क्षमता आणि अंतिम क्षणी शांत राहण्याचे कौशल्य यासाठी स्वतंत्र प्रशिक्षण आवश्यक आहे. या सगळ्यात महिला खेळाडूंची कामगिरी विशेष उल्लेखनीय आहे. हॉकीमध्ये ४४ वर्षांचा दुष्काळ संपवून मिळवलेले सुवर्ण, क्रिकेट, कबड्डी, बॉक्सिंग, तिरंदाजी आणि रिलेतील यश हे महिला खेळाडूंच्या वाढत्या सामर्थ्याचे प्रतीक आहे. त्यांच्या संघर्षकथा सांगण्यापेक्षा त्यांच्या यशासाठी आवश्यक व्यवस्था उभारणे अधिक महत्त्वाचे आहे.

खेळाडूंना आर्थिक मदत, अत्याधुनिक सुविधा, प्रशिक्षक, पोषण, वैद्यकीय सेवा आणि मानसिक प्रशिक्षण सातत्याने मिळाले पाहिजे. पदक जिंकल्यानंतर गौरव करण्यापेक्षा पदक जिंकण्यापूर्वीची व्यवस्था मजबूत करणे गरजेचे आहे. कारण भारतीय खेळाडूंची गुणवत्ता कमी नाही; कमतरता आहे ती सातत्यपूर्ण आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या व्यवस्थेची. जोपर्यंत ही व्यवस्था उभी राहत नाही, तोपर्यंत ‘अंडरडॉग’ म्हणून मिळवलेल्या प्रत्येक विजयाचा आनंद घ्यावा लागेल. पण भारताने कायम अंडरडॉगच राहायचे का? हा प्रश्न आता व्यवस्थेला विचारण्याची वेळ आली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



गौळीयाची ताकपिरें ।
कोण पोरें चांगलीं ॥१॥

येवढा त्यांचा छंद देवा ।
काय सेवा भक्ती ते ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयमधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# दुष्काळाचे संकट कोरोनापेक्षाही गंभीर

## उत्सवांवरील खर्च दुष्काळग्रस्तांसाठी द्या; महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**महाईन्यूज । नागपूर**

**राज्यातील दुष्काळी परिस्थिती गंभीर असून आगामी आठ महिने पाणी, चारा तसेच शेतकरी आणि शेतमजुरांच्या प्रश्नांना सामोरे जावे लागणार आहे. हे संकट कोरोनापेक्षाही मोठे असल्याचे सांगत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी समाजातील प्रत्येक घटकाने योगदान देण्याचे आवाहन केले. नागपुरात सोमवारी प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी नागरिक तसेच राजकीय कार्यकर्त्यांनी उत्सवांवरील अनावश्यक खर्च टाळून तो दुष्काळ निवारणासाठी वापरावा, असे सांगितले.**



दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर भाजपची प्रस्तावित पाच हजार कार्यकर्त्यांची रॅली रद्द करण्यात आली असून पक्षाकडून उत्सव साजरा न करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हारतुरे, फुले, बुके, बँड तसेच वाढदिवसावरील अनावश्यक खर्च टाळून तो पैसा गरजूंच्या मदतीसाठी द्यावा. अनेक भागांत पिण्याचे पाणी आणि चाऱ्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता असून शेतकरी आणि शेतमजुरांना त्याचा मोठा फटका बसू शकतो. दिवाळीपूर्वी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत पोहोचविण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

निवडणुकीच्या काळात पक्षातील नेते किंवा कार्यकर्त्यांमध्ये चुकीचे संदेश अथवा संभ्रम निर्माण होणार नाही, याची काळजी घेण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या. मंत्र्यांनी काही दिवस मुंबईला जाणे टाळून आपल्या मतदारसंघातील समस्या आणि निवडणूक व्यवस्थेवर लक्ष केंद्रित करावे, असे त्यांनी सांगितले. विदर्भाचा कार्यकर्ता म्हणून आपण स्वतः निवडणूक यंत्रणेवर लक्ष ठेवणार असून दररोज मतदार नोंदणीची माहिती एसएमएसद्वारे देण्याच्या सूचनाही करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

भाजपचे माजी आमदार अनिल सोले यांना उमेदवारी न मिळाल्याने काहीशी निराशा झाली असली तरी ते पक्षाचे नेते आहेत. उमेदवार निश्चित झाल्यानंतर सर्वांनी एकत्रितपणे काम करणे अपेक्षित आहे. आपण स्वतः सोले यांच्याशी चर्चा करून निवडणुकीत सहकार्य करण्याची विनंती करणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

दरम्यान, एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनावरून त्यांनी काँग्रेसवर टीका केली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सरकारची भूमिका सकारात्मक असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विद्यार्थ्यांनी मांडलेल्या मागण्यांवर निर्णय घेतल्याचा दावा त्यांनी केला. मात्र, काही ठिकाणी अद्याप आंदोलने सुरू असून काँग्रेसकडून चिथावणीखोर वक्तव्ये केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न राजकारणासाठी वापरू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांबाबतही बावनकुळे यांनी माहिती दिली. केवायसी किंवा ॲग्रीस्टॅक कार्डाच्या कारणामुळे कर्जमाफीचा लाभ न मिळालेल्या सुमारे दहा टक्के शेतकऱ्यांनाही लाभ देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कर्जमाफीचा लाभ शेवटच्या पात्र शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

### दुष्काळग्रस्तांसाठी उत्सवांना फाटा

दुष्काळाचे संकट गंभीर असून पुढील आठ महिने पाणी, चारा, शेतकरी आणि शेतमजुरांच्या प्रश्नांना सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे वाढदिवस, सत्कार, हार-फुले, पुष्पगुच्छ आणि बँड-बाजावरील अनावश्यक खर्च टाळून तो गरजू आणि दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी वापरण्याचे आवाहन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

# न्यायमूर्ती नितीन सांबरे यांच्याकडे दिल्ली उच्च न्यायालयाची सुत्रे!

**महाईन्यूज । नागपूर**

**नागपूरचे सुपुत्र न्यायमूर्ती नितीन सांबरे यांच्याकडे दिल्ली उच्च न्यायालयाच्या कार्यवाहक मुख्य न्यायमूर्तीपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. राष्ट्रपतींच्या पुढील निर्णयापर्यंत ते दिल्ली उच्च न्यायालयाचा कारभार सांभाळणार आहेत. यासंदर्भात केंद्रीय विधी व न्याय विभागाकडून सोमवारी अधिसूचना जारी करण्यात आली.**



दिल्ली उच्च न्यायालयाचे विद्यमान मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय यांची सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीपदी नियुक्ती झाल्याने मुख्य न्यायमूर्तीपद रिक्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर न्यायमूर्ती नितीन सांबरे यांच्यावर कार्यवाहक मुख्य न्यायमूर्ती म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे. ते दिल्ली उच्च न्यायालयातील द्वितीय क्रमांकाचे वरिष्ठ न्यायमूर्ती आहेत.

न्यायमूर्ती सांबरे यांचा जन्म १९ डिसेंबर १९६७ रोजी नागपूर येथे झाला. त्यांनी १९९२ मध्ये नागपूर युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ लॉ येथून एलएल.बी. पदवी प्राप्त केली. त्यानंतर त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई, औरंगाबाद आणि नागपूर या तिन्ही खंडपीठांमध्ये यशस्वी वकिली केली. १ सप्टेंबर २००७ रोजी त्यांची नागपूर खंडपीठात मुख्य सरकारी वकील म्हणून नियुक्ती झाली.

६ जानेवारी २०१४ रोजी न्यायमूर्ती सांबरे यांची मुंबई उच्च न्यायालयात अतिरिक्त न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर २ मार्च २०१६ रोजी ते स्थायी न्यायमूर्ती झाले. जुलै २०२५ मध्ये त्यांची दिल्ली उच्च न्यायालयात बदली करण्यात आली. आता दिल्ली उच्च न्यायालयाच्या कार्यवाहक मुख्य न्यायमूर्तीपदाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविण्यात आल्याने नागपूरच्या न्यायक्षेत्रातून त्यांच्या कारकिर्दीचा राष्ट्रीय स्तरावर गौरव झाला आहे.

### नागपूर खंडपीठात मुख्य सरकारी वकील

दिल्लीउच्च न्यायालयाचे विद्यमान मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय यांची सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे मुख्य न्यायमूर्तीपद रिक्त झाले आहे. न्यायमूर्ती सांबरे येथील द्वितीय क्रमांकाचे वरिष्ठ न्यायमूर्ती आहेत. १९ डिसेंबर १९६७ रोजी नागपूर येथे जन्मलेले न्यायमूर्ती सांबरे यांनी १९९२ मध्ये नागपूर युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ लॉ येथून एलएल.बी. पदवी प्राप्त केली आहे. त्यानंतर त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई, औरंगाबाद आणि नागपूर या तिन्ही खंडपीठांमध्ये यशस्वी वकिली केली. १ सप्टेंबर २००७ रोजी ते नागपूर खंडपीठात मुख्य सरकारी वकील झाले.

# दिल्ली पोलिसांवर लैंगिक छळाचा गंभीर आरोप

## एफआयआरसाठी रात्रभर ठिय्या मांडणाऱ्या महिला पत्रकारासह १७ जण ताब्यात

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**दिल्लीतील सीईसी ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी झालेल्या आंदोलनादरम्यान पोलिसांकडून लैंगिक छळ झाल्याचा आरोप करणाऱ्या महिला पत्रकारासह १७ जणांना सोमवारी सकाळी ताब्यात घेण्यात आले. या पत्रकारांसह काही पत्रकार, युट्यूबर्स आणि आंदोलकांनी संसद मार्ग पोलीस ठाण्याबाहेर रात्रभर ठिय्या देत संबंधित पोलिसांविरोधात एफआयआर दाखल करण्याची आणि कारवाईची मागणी केली होती.**



ताब्यात घेतलेल्या सर्वांना बसमधून दिल्ली कॅन्ट पोलीस ठाण्यात नेण्यात आले. तक्रारदार महिला पत्रकाराने पोलिस अधिकाऱ्यांना भेटून आपल्या तक्रारीवर काय कारवाई झाली, याची माहिती घेण्यासाठी पोलीस ठाण्याच्या परिसरात जाण्याची मागणी केली होती. याबद्दल सविस्तर वृत्त दी इंडियन एक्सप्रेसने दिले आहे.

३ ऑक्टोबर रोजी जंतरमंतर परिसरात आंदोलनाचे वार्तांकन करताना दिल्ली पोलिसांच्या कर्मचाऱ्यांनी लैंगिक छळ केल्याचा आरोप तीन महिला पत्रकारांनी केला आहे. पोलिसांनी या तिन्ही तक्रारी स्वीकारून त्या गुन्हे शाखेकडे चौकशीसाठी पाठवल्या आहेत. तक्रारींची पडताळणी करण्यासाठी संबंधित महिलांचे जबाब नोंदवण्यात आले असून घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे.

एका पत्रकाराच्या तक्रारीनुसार, महिला आंदोलकांना पुरुष पोलीस कर्मचारी ताब्यात घेत असल्याचे पाहून तिने तिथे महिला पोलीस कर्मचारी नसल्याचा मुद्दा उपस्थित केला. त्यावेळी एका पोलिस अधिकाऱ्याने आपल्याला धक्का दिल्याचा तिचा आरोप आहे. दुसऱ्या पत्रकाराने आपण अशोक रोडवर आंदोलनाचे वार्तांकन करत असताना एका पोलिस कर्मचाऱ्याने आपल्याला अयोग्य पद्धतीने स्पर्श केल्याचा आरोप केला आहे. संबंधित आरोपांची सत्यता तपासण्यासाठी पोलिसांकडून सीसीटीव्ही आणि इतर उपलब्ध पुरावे तपासले जात आहेत.

दिल्ली पोलिसांनी या आरोपांवर स्वतंत्र चौकशी सुरू असल्याचे स्पष्ट केले आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, ३ ऑक्टोबरच्या आंदोलनादरम्यान कायदा-सुव्यवस्थेच्या परिस्थितीत या तक्रारी करण्यात आल्या आणि त्यांची निष्पक्ष चौकशी करण्यासाठी प्रकरण गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आले आहे. दरम्यान, पोलिसांनी संसद मार्ग परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १६३ अंतर्गत जमावबंदीचे आदेश लागू असल्याचे सांगितले. हा परिसर आंदोलनासाठी निर्धारित नसल्याने आंदोलकांना तेथून दूर जाण्यास सांगण्यात आले होते. मात्र, त्यांनी जागा सोडण्यास नकार दिल्याने ताब्यात घेतल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

ताब्यात घेताना पोलिसांकडून मारहाण किंवा गैरवर्तन झाल्याचा आरोपही आंदोलकांकडून करण्यात आला आहे. मात्र, पोलिसांनी हा आरोप फेटाळला असून, ताब्यात घेताना काही जणांनी विरोध केल्याने त्यांना पुरुष आणि महिला पोलिस कर्मचाऱ्यांनी बसमध्ये नेल्याचे सांगितले.

### शेकडो जणांना ताब्यात

सीईसी ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्लीमध्ये सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान गेल्या काही दिवसांत मोठ्या प्रमाणावर आंदोलकांना ताब्यात घेण्यात आले आहे. ३ ऑक्टोबरलाही 'ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशन'च्या अध्यक्षा नेहा बोरा, योगेंद्र यादव आणि ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांच्यासह १५० हून अधिक जणांना जंतरमंतरकडे जाण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून ताब्यात घेण्यात आले होते.

या पार्श्वभूमीवर तीन महिला पत्रकारांच्या तक्रारी आणि त्यानंतर एफआयआरच्या मागणीसाठी झालेला ठिय्या यामुळे दिल्ली पोलिसांच्या कारवाईवर पुन्हा प्रश्न उपस्थित झाले आहेत. मात्र, लैंगिक छळाच्या आरोपांबाबत अंतिम अहवाल अद्याप समोर आलेला नसून गुन्हे शाखेकडून चौकशी सुरू आहे.

# भाजपची राज्यसभेसाठी ८ उमेदवारांची घोषणा; स्मृती इराणी, हरदीप पुरींना डच्चू

**महाईन्यूज** । उत्तर प्रदेश

**उत्तर प्रदेशातल्या १० राज्यसभेच्या जागांसाठी भाजपाने ८ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. ज्या नावांची चर्चा होती ती नावं या यादीत नाहीत. भाजपाने जी नावं जाहीर केली आहेत ती पाहता स्थानिक आणि जातीय समीकरण भाजपाने साधलं आहे अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे. तसंच हरदीप पुरी, स्मृती ईराणी यांची नावं यादीत नाहीत. उत्तर प्रदेशात येऊ घातलेली विधानसभा निवडणूक लक्षात घेऊन ही यादी जाहीर करण्यात आल्याचं दिसून येतं आहे.**




मागील काही दिवसांपासून राज्यसभेवर ज्यांना पाठवण्यात येईल त्यात हरदीप पुरी, स्मृती ईराणी, हरिश द्विवेदी आणि बी. एल. वर्मा या नावांची जोरदार चर्चा होती. मात्र जी आठ नावांची यादी समोर आली आहेत त्यात यातलं एकही नाव नाही. माजी खासदार कौशल किशोर आणि संजीव बलियान यांच्या नावांचीही चर्चा होती पण त्यांनाही राज्यसभेचं तिकिट मिळालेलं नाही.

भाजपामध्ये नवनियुक्त सरचिटणीसांना राज्यसभेवर पाठवण्याचा पायंडा हा गेल्या अनेक वर्षांपासूनचा आहे. मागच्या दहा वर्षात जे जे सरचिटणीस राज्यसभेवर गेले आहेत त्यांना पद सांभाळल्यानंतर काही काळाने राज्यसभेची संधी देण्यात आली आहे. अरूण सचिव, विनोद तावडे यांनी दीर्घकाळ पक्षासाठी काम केल्यानंतर त्यांना संधी मिळाली आहे. अशात सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार स्मृती ईराणींना तिकिट मिळालं नाही कारण पक्षाने जे लोकसभेत हारले आहेत अशांना तिकिट द्यायचं नाही असा निर्णय घेतला होता. स्मृती ईराणी या लोकसभेची निवडणूक हरल्या आहेत त्यामुळे त्यांना राज्यसभेचं तिकिट देण्यात आलं नाही असं सांगितलं जातं आहे.

### हरदीप पुरींवर पंतप्रधान नरेंद्र मोदी नाराज?

हरदीप पुरी आणि बी.एल. वर्मा यांचा राज्यसभेतील कार्यकाळ पुढील महिन्यात संपतो आहे. दोघंही केंद्रीय मंत्री आहेत. पण त्यांना राज्यसभेचं तिकिट देण्यात आलेलं नाही. त्यामुळे आता अशीही चर्चा आहे की त्यांचं मंत्रिपदही त्यांचा कार्यकाळ संपल्यावर काढून घेतलं जाईल. भाजपाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार हरदीप पुरी यांच्या कामकाजाची पद्धत पंतप्रधान नरेंद्र मोदींना पटलेली नाही. खासकरून इराण संकटाच्या काळात हरदीप पुरी यांनी योग्य ती भूमिका बजावली नाही असं त्यांना वाटतं आहे. त्यामुळे येत्या काळात त्यांना पदावरून दूर केलं जाऊ शकतं. पुरी यांना दोनदा राज्यसभेवर पाठवण्यात आलं आहे. पुरी यांनी लोकसभा निवडणूकही लढवली होती पण ती ते हरले आहेत. आता नोव्हेंबर महिन्यात त्यांचा कार्यकाळ संपणार आहे. त्यानंतरही पुढचे सहा महिने ते मंत्री पदावर राहू शकतात. आता नेमकं त्यांच्या बाबतीत काय ठरवलं जाईल हे पाहणंही महत्त्वाचं असेल.




# अविनाशने जिंकली 'खतरों के खिलाडी 15'ची ट्रॉफी!

लोकप्रिय रिॲलिटी शो 'खतरों के खिलाडी १५'चा विजेता अविनाश मिश्रा ठरला आहे. अविनाश मिश्राने टॉप ३ फायनलिस्ट ऋत्विक धनजानी आणि ओरीला हरवून 'खतरों के खिलाड़ी १५'ची ट्रॉफी आपल्या नावावर केली. विजेतेपदासह अविनाशने २० लाख रुपयांचे बक्षीस, युरोपची ट्रिप आणि एक कारही जिंकली. टॉप ३ फायनलिस्टला एक बाइकही देण्यात आली. 'खतरों के खिलाडी १५' चे शूटिंग केप टाउन, दक्षिण आफ्रिकामध्ये झाले. यंदा 'चॅम्पियन्स विरुद्ध चॅलेंजर्स' हे रोमांचक स्वरूप पाहायला मिळाले. अखेर सध्या अविनाशने विजेतेपदावर नाव कोरल्याने त्याच्या या यशाचे अनेकांकडून कौतुक केले जात आहे. यापर्वात अनेक थरारक स्टंट्स पाहायला मिळाले. अविनाशची इच्छाशक्ती आणि स्टंट्समधील उत्कृष्ट कौशल्य यामुळे तो 'खतरों के खिलाडी १५' विजेता ठरला आहे. रोहित शेट्टीने अविनाशचे नाव विजेता म्हणून जाहीर करताच, त्याला आनंदाश्रू अनावर झाले. सुरुवातीपासूनच अविनाश मिश्रा शोमध्ये सर्वात मजबूत परफॉर्मर्समध्ये एक म्हणून उभा राहिला आहे. अविनाशने २०१६ मध्ये 'सेठजी'पासून अभिनयाची सुरुवात केली आणि नंतर २०१७ मध्ये 'इश्कबाज'मध्ये तो दिसला होता. २०१८ मध्ये 'मरियम खान रिपोर्टिंग लाइव'मधील त्याच्या कामगिरीने त्याला ओळख मिळवून दिली. २०२२ च्या 'नाथ' या शोच्या यशानंतर अविनाश २०२४ मध्ये 'बिग बॉस १८'मध्ये दिसला.



# गिरीजाचा ग्लॅमरस लूक!

अभिनेत्री गिरीजा ओक-गोडबोलेचा मोठा चाहता वर्ग आहे. नॅशनल क्रश म्हणून तिला मोठी लोकप्रियता मिळाली असून, ती आपल्या हटक्या स्टाइलसाठी नेहमीच कायम चर्चेत असते. गिरीजा ओकने आपल्या लूक्सने कायम प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेते. तिच्या फोटोशूटची सोशल मीडियात कायम चर्चा होत असते. अलिकडेच अभिनेत्रीने शेअर केलेली पोस्ट चर्चेचा विषय ठरत आहे. अभिनेत्रीने आपल्या लेटेस्ट फोटोशूटमध्ये हाय स्लिट गाऊन परिधान केला आहे. लाल रंगाच्या ड्रेसमध्ये अभिनेत्री सुंदर दिसत आहे. गिरीजा ओकने सोशल मीडियात आपले लेटेस्ट फोटोस शेअर केले आहेत. हाय स्लिट ड्रेसमध्ये अभिनेत्रीने मिनिमल मेकअप लूक कॅरी केला आहे. या लाल रंगाच्या ड्रेसवर गिरिजाने ओपन शॉर्ट हेअरस्टाइल ठेवली आहे. तिचा मनमोहक लूक पाहून चाहते थक्क झाले आहेत. तिने केवळ इअररिंग्स घातले आहेत. कमी ॲक्ससेसरीजमध्येही तिचा जबरदस्त लूक पाहायला मिळत आहे. तिने या ड्रेसवर एकापेक्षा एक सुंदर पोज दिले आहेत.



# 'वेट्टुवम'मध्ये शोभिता धुलिपाला

दक्षिणेतील बहुप्रतीक्षित चित्रपट 'वेट्टुवम'चा टीझर निर्मात्यांनीं जारी केला आहे. यात चित्रपटाची कहाणी पंकज त्रिपाठी ऐवकत असून सुरुवातही त्यांची झलक दाखवत करण्यात आली आहे. या चित्रपटात वेगवेगळ्या गटांदरम्यान स्वत:चा दबदबा काययम ठेवण्याची लढाई दिसणार आहे. या लढायांना जुन्या काळातील भारताच्या पारंपरिक युद्धतंत्रज्ञानांच्या आधारावर तयार करण्यात आले असून याचमुळे सर्व कलाकारांनी वेगवेगळया प्रकारच्या मार्शल आर्ट्समध्ये प्राविण्य प्राप्त करण्यासाठी कठोर प्रशिक्षण घेतले आहे. पा. रंजीत यांनी स्वत:च्या 'वेट्टुवम' चित्रपटाची घोषणा केली आहे. याच्या हिंदी टीझरला पंकज त्रिपाठींचा आवाज लाभला आहे. तर तमिळ वर्जनमध्ये पा. रंजती, तेलगूमध्ये राणा दग्गुबाती, कन्नडमध्ये किच्चा सुदीप आणि मल्याळीमध्ये सौबिन शाहिरचा आवाज ऐकू येतो. ते सर्व व्हिडिओत चित्रपटाच्या वेगवेगळ्या पैलूंविषयी सांगत त्यावर प्रकाश टाकत आहेत. चित्रपटात आर्या, व्ही.आर. दिनेश, शोभिता धुलिपाला, कलैयारासन, माइम गोपी, गुरु सोमासुंदरम, शबीर कल्लाराक्कल, जॉन विजय, साई धीना, आनंद सामी, हरीश उथमन, लिजी, लिंगेश प्रेम कुमार, कविता भारती, अर्जुन, संथा कुमार, मेलोडी, मनीषा, निम्मी, राफाइल, विक्रम, नवीन आणि प्रकाश हे कलाकार दिसून येतील. या चित्रपटाचे दिग्दर्शन पा. रंजीत यांनी केले असून त्यांनीच याची कहाणी लिहिली आहे. हा चित्रपट तमिळ, तेलगु, हिंदी, मल्याळी, कन्नड भाषेत प्रदर्शित होणार आहे.

# भारत-वेस्ट इंडिज संघांवर ICCची कारवाई!

## तिसऱ्या वनडे सामन्यातील चूक पडली महागात; टीम इंडियाला दुप्पट शिक्षा

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील एकदिवसीय मालिका यजमान संघाने २-१च्या फरकाने जिंकली. वेस्ट इंडिज संघाने तिसऱ्या एकदिवसीय मालिकेत उत्कृष्ट कामगिरी करत भारतावर विजय मिळवला आणि मालिकेचा शेवट गोड केला. तर भारताने मालिकेतील सुरूवातीचे दोन्ही सामने जिंकत मालिकेत अभेद्य आघाडी मिळवत मालिका आपल्या नावे केली होती. पण या मालिकेनंतर आयसीसीने भारत आणि वेस्ट इंडिज अशा दोन्ही संघांवर कारवाई केली आहे, का ते जाणून घेऊया.**







भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतील तिसऱ्या आणि अखेरच्या सामन्यात स्लो ओव्हर रेटमुळे ICCने दोन्ही संघांवर कारवाई केली आहे. न्यू चंदीगडमधील PCA इंटरनॅशनल क्रिकेट स्टेडियममध्ये हा सामना खेळवण्यात आला.ICCच्या माहितीनुसार, भारत निर्धारित ओव्हर रेटपेक्षा चार षटकं मागे होता, तर वेस्ट इंडिजचा संघ दोन षटकं मागे होता. भारत चार षटकं मागे असल्यानेच त्यांना अखेरच्या षटकांमध्ये मोठा फटका बसला आणि परिणामी वेस्ट इंडिजने सामना जिंकला होता.

या उल्लंघनासाठी भारतीय खेळाडूंना त्यांच्या सामन्याच्या मानधनाच्या २० टक्के दंड, तर वेस्ट इंडिजच्या खेळाडूंना १० टक्के दंड ठोठावण्यात आला आहे. ICCच्या निवेदनानुसार, एमिरेट्स आयसीसी आंतरराष्ट्रीय सामना पंचांच्या गटाचे प्रकाश भट्ट यांनी ही कारवाई केली. दोन्ही संघांच्या कर्णधारांनी आपली चूक मान्य केली. त्यामुळे औपचारिक सुनावणीची गरज पडली नाही.

तिसऱ्या वनडेत भारताचा कर्णधार शुबमन गिलने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. भारताने ५० षटकांत ७ विकेट गमावून ३५१ धावा केल्या. केएल राहुलने नाबाद १२९ धावांची खेळी, तर रोहित शर्माने ९२ धावा करत भारताला मोठी धावसंख्या उभारून दिली. ३५२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजने ४८.२ षटकांत ५ विकेट्स गमावून सामना जिंकला. कर्णधार शे होपने १४३ चेंडूत १६२ धावांची शानदार खेळी करत संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.

होपव्यतिरिक्त वेस्ट इंडिजचा फलंदाज अमीर जांगूने अर्धशतक झळकावलं, तर किमो पॉलनेही ४०हून अधिक धावांचं योगदान दिलं. मात्र, या सामन्यातील पराभवानंतरही भारताने तीन सामन्यांची वनडे मालिका २-१ ने आपल्या नावावर केली.

## रोनोल्डोच्या पोर्तुगाल संघातील कमबॅकबाबत जॉर्ज जिझस यांचं मोठं वक्तव्य

**महाईन्यूज । पोर्तुगाल**

**फुटबॉलमधील दिग्गज फुटबॉलपटूंपैकी असलेला ख्रिस्तियानो रोनाल्डो सध्या चर्चेचा विषय आहे. पोर्तुगालचा स्टार फुटबॉलपटू असलेल्या रोनाल्डोने गेल्या आठवड्यात संघ सोडला होता. नॉर्वेविरुद्धच्या सामन्यात त्याला सुरुवातीच्या संघात स्थान मिळालं नव्हतं. त्यानंतर डेन्मार्कविरुद्धच्या सामन्यातही तो सुरुवातीपासून खेळणार नसल्याचं त्याला सांगण्यात आलं होतं. यानंतर रोनाल्डोने संघ सोडण्याचा निर्णय घेतला आणि योग्य वेळी याबाबत स्पष्टीकरण देणार असल्याचं म्हटलं होतं. यादरम्यान अजून एक महत्त्वाची अपडेट समोर आली आहे.**




पोर्तुगालचे प्रशिक्षक जॉर्ज जिझस यांनी स्टार फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डोच्या राष्ट्रीय संघातील पुनरागमनाची शक्यता नाकारलेली नाही. रोनाल्डो आणि प्रशिक्षक यांच्यातील मतभेदांमुळे आणि वादांमुळे संघाची साथ सोडल्याची चर्चा सुरू आहे. रोनाल्डो पोस्ट शेअर करत या संपूर्ण घटनेची कधी माहिती देणार याची चाहते वाट पाहत असताना पोर्तुगालच्या प्रशिक्षकांनी मोठं वक्तव्य केलं आहे.

रोनाल्डोच्या पुनरागमनासाठी पोर्तुगाल संघाचे दरवाजे खुले असल्याचं जिझस यांनी स्पष्ट केलं आहे. रॉयटर्स या वृत्तसंस्थेच्या वृत्तानुसार, नॉर्वेविरुद्ध पोर्तुगालच्या २-१ विजयाच्या सामन्यानंतर जिझस म्हणाले, "त्याला परत यायचं असेल तर तो राष्ट्रीय संघात परतू शकतो. पुढील संघनिवडीपूर्वी आम्ही त्याच्याशी चर्चा करू शकतो. मात्र, अंतिम निर्णय क्रिस स्वतः घेईल."

"राष्ट्रीय संघासोबतचा आपला प्रवास कसा आणि केव्हा संपवायचा, याचा निर्णय त्यानेच घ्यायला हवा. मी पहिल्यांदा संघाची जबाबदारी स्वीकारली तेव्हा त्याला म्हटलं होतं, 'मला तुझी गरज आहे. तू संघात माझ्यासोबत असायला हवा. तू खेळत असशील किंवा नसेल, तरी मला तुझी गरज आहे आणि आताही मी पुन्हा तेच सांगत आहे."

रोनाल्डोच्या अनुपस्थितीतही पोर्तुगालने डेन्मार्कचा पराभव केला. त्यानंतर नॉर्वेविरुद्ध विजय मिळवत संघाने नेशन्स लीगच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. रोनाल्डो हा पोर्तुगालचा सर्वाधिक गोल करणारा आणि सर्वाधिक सामने खेळणारा खेळाडू आहे. त्याच्या नावावर २३४ आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये तब्बल १४६ गोल आहेत.

विशेष म्हणजे, जॉर्ज जिझस यांनी यापूर्वी सौदी अरेबियातील अल-नासर क्लबमध्ये रोनाल्डोला प्रशिक्षण दिलं आहे. रोनाल्डोने इच्छा व्यक्त केल्यास पुढील आंतरराष्ट्रीय ब्रेकमध्ये तो पुन्हा पोर्तुगालच्या संघात दिसू शकतो, अशी अपेक्षा जिझस यांनी व्यक्त केली आहे. पोर्तुगालचा पुढील सामना १४ नोव्हेंबरला डेन्मार्कविरुद्ध होणार असून, त्यानंतर १७ नोव्हेंबरला संघ वेल्सविरुद्ध खेळण्यासाठी रवाना होईल.

### पोर्तुगालला अजूनही रोनाल्डोची गरज

पोर्तुगीज फुटबॉल फेडरेशनचे अध्यक्ष पेड्रो प्रोएन्सानेही रोनाल्डो संघाच्या भविष्यातील योजनांचा भाग असल्याचं स्पष्ट केलं आहे. रोनाल्डोने संघ सोडणं हा एक गैरसमज होता आणि या प्रकरणावर अंतर्गत पातळीवर चर्चा होणं गरजेचं असल्याचं त्यांनी म्हटलं. आरटीपीशी बोलताना प्रोएन्सा म्हणाले, "तो त्याच्या खेळाच्या गुणवत्तेच्या जोरावर राष्ट्रीय संघात आहे आणि याबाबत कोणतीही शंका असू नये. आपण ख्रिस्तियानो रोनाल्डोच्या योगदानाचा सन्मान केला पाहिजे."

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। मंगळवार ।
दि. 06 ऑक्टोबर 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# रावेतमध्ये होणार 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्प; निगडी, प्राधिकरण, आकुर्डी परिसर प्रभावित?

## महानगरपालिका प्रशासनाचा २५ एकर जागेचा प्रस्ताव



**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**मोशी कचरा डेपोतील दुर्घटनेनंतर शहरातील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न ऐरणीवर आला असताना, आता पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासन रावेत येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची (MIDC) सुमारे २५ एकर जागा प्रस्तावित वेस्ट टू एनर्जी प्रकल्पासाठी ताब्यात घेण्याच्या तयारीत आहे. या प्रकल्पाचा सर्वाधिक प्रभाव निगडी, प्राधिकरण, आकुर्डी व यमुनानगर परिसरावर होण्याची शक्यता आहे.**




दि. ८ जुलै २०२६ रोजी मुसळधार पावसामुळे मोशी कचरा डेपोत वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर सुमारे ७० फूट उंचीचा कचऱ्याचा डोंगर कोसळला. या दुर्घटनेत ९ कामगारांचा मृत्यू झाला. कचरा व्यवस्थापनावर आक्षेप नोंदवण्यात आले. शिवसेना (शिंदे गट) खासदार श्रीरंग बारणे व नगरसेविका सुलभा उबाळे यांनी मोशी कचरा डेपोवरून प्रशासनावर जोरदार टीका केली. प्रशासनाने नवीन जागेचा शोध सुरू केला.



कचरा प्रक्रियेसाठी पर्यायी प्रकल्पांकरिता काही जागा निश्चित करण्यात आल्या. मात्र त्या-त्या प्रभागातील नगरसेवकांनी त्याला विरोध केला. त्यामुळे आता प्रशासनाने रावेतची जागा पुढे केल्याची चर्चा अधिकाऱ्यांमध्ये आहे.

आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांनी दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी राज्याच्या नगर विकास विभागाला पाठवलेल्या पत्रात रावेत येथील MIDC च्या स.नं. १७७ पै., १५६ पै. व १५८ पै. मधील सुमारे २५ एकर जागा वेस्ट टू एनर्जी प्रकल्पासाठी महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याची मागणी केली आहे.

मोशीच्या मुद्द्यावर आक्रमक झालेले लोकप्रतिनिधी रावेतच्या प्रस्तावावर काय भूमिका घेतात, याकडे प्राधिकरणवासीयांचे लक्ष लागले आहे. जागेचा निर्णय घेताना सर्व पर्यायांची तुलना, पारदर्शक प्रक्रिया व नागरिकांशी संवाद आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

### पत्रातील प्रमुख मुद्दे :

- मोशी डेपोची क्षमता पूर्णपणे संपली असून तेथे दररोज १५०० ते १६०० मे.टन कचरा येतो. त्यापैकी सुमारे १००० मे.टनावर प्रक्रिया होते, तर ५०० ते ६०० मे.टन कचरा शिल्लक राहतो.
- शहरातील कचरा पुढील ५, १० व २० वर्षांत अनुक्रमे सुमारे २२००, ३३०० व ४८०० मे.टनांपर्यंत वाढण्याचा अंदाज.
- मोशी येथे नवीन जागा उपलब्ध नसल्याने संपूर्ण शहरात पाहणी करून रावेतची जागा निवडल्याचे प्रशासनाचे म्हणणे.
- ही जागा MIDC कडून वापरात नाही व प्राईम लोकेशनमध्ये येत नाही, असा दावा.
- प्रकल्प उत्पन्न देणारा नसल्याने जागा विनामोबदला अथवा नाममात्र दराने देण्याची मागणी.

### नागरिकांचे प्रश्न

- वाढत्या कचऱ्याचे प्रमाण पाहता प्रकल्पामुळे वाहतूक, धूर, दुर्गंधी व प्रदूषणाचा त्रास किती वाढेल?
- प्रकल्पाचा पर्यावरणीय परिणाम अभ्यास (EIA) व नागरिकांच्या सूचना-हरकती घेतल्या जाणार का?
- नगरसेवकांच्या विरोधामुळे बाद झालेल्या जागांचा विचार पुन्हा का होत नाही?
- मोशी येथील दुर्घटनेची जबाबदारी निश्चित झाली का, आणि नवीन प्रकल्पाची सुरक्षा हमी काय?

# एमआयटी आळंदीत 'मॅथलेटिक्स'आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा उत्साहात

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**आळंदी येथील माईर्स एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या गणित विभागाच्या वतीने 'मॅथलेटिक्स – पॉवर युवर ब्रेन' या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विविध ९ महाविद्यालयांतील एकूण २४७ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.**




या उपक्रमांतर्गत पोस्टर सादरीकरण, पीपीटी सादरीकरण, प्रश्नमंजूषा, शोधनिबंध सादरीकरण, व्हिडिओ निर्मिती तसेच लुडो आणि बुद्धिबळ अशा वैविध्यपूर्ण बौद्धिक व क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सहभागी विद्यार्थ्यांनी आपले ज्ञान, तर्कशक्ती आणि सादरीकरण कौशल्याचे उत्तम प्रदर्शन घडवले. स्पर्धेचे उद्घाटन 'ब्लूबायसन सायबर'चे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल साबळे यांच्या हस्ते संपन्न झाले.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे, उपसंचालक डॉ. अक्षदा कुलकर्णी, डॉ. रश्मी लाड, प्रा. विजयालक्ष्मी तसेच प्रमुख पाहुणे स्वामीराज सूर्यकांत भिसे यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी विजेत्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके, पदके व प्रमाणपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले.

हा कार्यक्रम गणित विभागप्रमुख सौ. सुषमा चाळके यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. समन्वयक म्हणून डॉ. राहुल खलाटे व मनोज ढाके यांनी कामकाज पाहिले. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी गणित विभागातील डॉ. प्रदीप पानसरे, डॉ. संगीता बिराजदार, डॉ. श्रीराम कारगावकर, प्रा. संजय गुंजाळ, प्रा. मंजुळा चौधरी, प्रा. वसंत कारामाड, प्रा. हनुमंत मावकर, प्रा. राही शेख, प्रा. संध्या लटपटे तसेच विद्यार्थी समन्वयक सार्थक मंथळे व सोमलिंग शेळके यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद पाहता भविष्यातही असे बौद्धिक उपक्रम सातत्याने राबविण्याचा मानस संयोजकांनी व्यक्त केला.

# बॉक्सिंगमध्ये आर.के.एल.च्या विद्यार्थ्यांचा डंका!

## जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत योगिताला सुवर्ण, तर तन्मयला रौप्य पदक

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद (ZP) बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत 'आर.के.एल. गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूल'च्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करत मोठे यश संपादन केले आहे. या स्पर्धेत शाळेच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाच्या बळावर सुवर्ण आणि रौप्य पदकाची कमाई करत शाळेचा नावलौकिक वाढवला.**



स्पर्धेत इयत्ता आठवीतील विद्यार्थिनी योगिता हिने 'अंडर-१९' वयोगटात अत्यंत प्रभावी खेळ दाखवत सुवर्णपदकाला गवसणी घातली. तर 'अंडर-१४' वयोगटात तन्मय याने जोरदार झुंज देत उपविजेतेपदासह रौप्य पदक पटकावले.

विद्यार्थ्यांच्या या दणदणीत यशाबद्दल आर.के.एल. गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूलचे सीईओ डॉ. पुष्कर चोबे आणि सीओओ मित्तल शहा यांनी योगिता व तन्मय यांचे विशेष कौतुक केले. "विद्यार्थ्यांचे हे यश संपूर्ण शाळेसाठी आणि पिंपरी-चिंचवड शहरासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे," असे डॉ. पुष्कर चोबे यांनी म्हटले.

याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका, क्रीडा प्रशिक्षक आणि शिक्षकवृंदांनी दोन्ही विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करत त्यांना पुढील क्रीडा वाटचालीस व उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.




## निगडीत हाइट बॅरिअरला ट्रकची धडक

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

निगडी येथील चिकन चौकात एका मालवाहू ट्रकने लोखंडी हाइट बॅरिअरला जोरदार धडक दिल्याची घटना घडली. या धडकेत हाइट बॅरिअरचे मोठे नुकसान झाले असून, घटनेचा व्हिडिओही समोर आला आहे.

चिकन चौक परिसरात अवजड वाहनांच्या उंचीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि वाहतुकीची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी लोखंडी हाइट बॅरिअर उभारण्यात आले आहे. मात्र, अतिवेगाने आलेल्या मालवाहू ट्रकने या बॅरिअरला जोरदार धडक दिल्याने बॅरिअरचा काही भाग वाकल्याचे आणि त्याचे नुकसान झाल्याचे दिसून येत आहे.

अपघातानंतर काही काळ परिसरातील वाहतूक विस्कळीत झाली होती. स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांनी घटनास्थळी गर्दी केल्याने वाहतुकीवर परिणाम झाला. संबंधित यंत्रणांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत करण्याचे काम केले.

दरम्यान, हाइट बॅरिअरचे नेमके किती नुकसान झाले आहे आणि ट्रक चालकाविरोधात कोणती कारवाई करण्यात येणार आहे, याबाबतची अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून, अवजड वाहनांच्या बेदरकार वाहतुकीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## आर.के.एल. गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांची 'गोल्डन बेल्ट कराटे स्पर्धेत' देदीप्यमान कामगिरी

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**आर.के.एल. गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट क्रीडाकौशल्याच्या जोरावर पुन्हा एकदा शाळेच्या यशात मानाचा तुरा रोवला आहे. नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय 'गोल्डन बेल्ट कराटे चॅम्पियनशिप'मध्ये शाळेच्या आर्य कांबळे आणि मानसी कांबळे यांनी दैदिप्यमान कामगिरी करत भरघोस यश संपादन केले.**



या स्पर्धेत आर्य राजू कांबळे याने आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करत सुवर्णपदक आणि स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडूचा 'बेस्ट फायटर अवॉर्ड' पटकवला. तर मानसी कांबळे हिने अत्यंत चुरशीच्या सामन्यात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत रौप्यपदकावर आपले नाव कोरले. दोन्ही विद्यार्थ्यांच्या या यशामुळे क्रीडा क्षेत्रात आणि परिसरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल बोलताना आर.के.एल. गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूलचे सीईओ डॉ. पुष्कर चोबे आणि सीओओ मित्तल शहा यांनी दोन्ही गुणवंत खेळाडूंचे मनापासून अभिनंदन केले. "विद्यार्थ्यांची मेहनत, धैर्य, अनुशासन आणि खेळाप्रती असलेले समर्पण यामुळेच हे मोठे यश शक्य झाले आहे. आर.के.एल. गॅलेक्सी स्कूल नेहमीच अभ्याससोबतच क्रीडा क्षेत्रातही विद्यार्थ्यांना पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन देते," असे मत त्यांनी व्यक्त केले.

तसेच शाळेच्या प्राचार्या, व्यवस्थापन मंडळ (मॅनेजमेंट) आणि सर्व शिक्षकवृंद यांनी आर्य आणि मानसी यांचे अभिनंदन करत त्यांना भविष्यातील वाटचालीस आणि उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.


Who Needs
Bone Density
CheckUp ?
Women After 40s
Long Sitting Jobs
Previous Fractures
Long Term Steroids Use
People With Vitamin D Deficiency
Consult with our experts now!
020-67313000 / +91 98220 55986
Sainath Hospital, Sant Nagar, Sector no. 4, Moshi Pradhikaran, Pune - Nashik Highway, Pune 412105
SAINATH HOSPITAL
Assuring Quality Care
Center Of Excellence For Trauma & Joint Replacement Surgery
www.sainathhospital.com